# भुयारी गटार योजना

# उच्च न्यायालयात जनहित याचिका स्वीकृत

## माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी केली दाखल ■ शासनाला चार आठवड्यांची मुदत

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.22 )–** शहरातील भुयारी गटार योजनेची कामे गेल्या पाच वर्षात पूर्णत: ठप्प पडलेली आहेत. नवीन निधी किंवा काम तर मंजूर करणे तर दूरच पण सन 2014 ते 2019 या काळात मंजूर होऊन कार्यारंभ आदेश झालेली कामे सुद्धा पूर्णत्वास नेण्यात प्रशासन व लोकप्रतिनिधी पूर्णत: अपयशी ठरलेले आहेत. परिणामी निद्रिस्त प्रशासनाला जागे करण्याकरिता माजी मंत्री डॉ.सुनील देशमुख यांनी अमरावती शहरातील प्रथितयश विधीज्ञ ॲड.प्रवीण पाटील यांचे सहकार्याने मुंबई उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठामध्ये रखडलेल्या अमरावती भुयारी गटार योजनेच्या विषयावर महाराष्ट्र शासन, सचिव,पाणीपुरवठा व मलनिस्सारण , सचिव नगर विकास विभाग, कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व आयुक्त महानगरपालिका अमरावती यांना प्रतिवादी करून जनहित याचिका दाखल केली आहे. सदर



याचिका न्यायमूर्ती नितीन सांबरे व न्यायमूर्ती वृषाली जोशी यांचे पीठाने स्वीकृत केली आहे. प्रतिवादी केलेल्या संबंधितांना नोटीस बजावून चार आठवड्यांमध्ये उत्तर सादर करण्याचे आदेशित केलेले आहे.

यापूर्वीसुद्धा अमरावती शहरातील बेलोरा विमानतळाच्या विकासाकरिता डॉ. सुनील देशमुख यांनी विधीज्ञ ॲड.प्रवीण पाटील यांचे सहकार्याने जनहित याचिकेच्या माध्यमातून शासनाला बिलोरा विमानतळाचा विकास करण्याकरिता बाध्य केले होते ते आता उद्घाटनाच्या अंतिम टप्प्यात आलेले आहे हे विशेष.

अमरावती शहरातील भुयारी गटारी योजना 1997 पासून सुरुवात झाली. मूळ योजनेचा आकृतीबंध 123 कोटी रुपयांचा होता. परंतु यामध्ये तब्बल 66 टक्के म्हणजे तब्बल 82 कोटी निधी हा एकट्या महानगरपालिकेला उभा करायचा होता. याकरिता आपल्या हिश्श्याची रक्कम उभारण्याकरिता मनपाद्वारे हुडकोकडे कर्ज प्रस्ताव सादर करण्यात आला होता परंतु हुडकोच्या अटी शर्ती ची पूर्तता न होऊ शकल्या कारणाने हुडकद्वारे कर्ज पुरवठा नाकारण्यात आला. 1999 मध्ये डॉ.सुनील देशमुख अमरावती शहराचे आमदार म्हणून निवडून आल्यानंतर शासकीय अनुदान व वैधानिक विकास महामंडळाकडून प्राप्त एकूण 34 कोटी रुपयांमध्ये योजनेचे कार्य प्रगतीपथावर नेण्यास सुरुवात केली.

यामध्ये लालखडी येथील सिवेज ट्रीटमेंट प्लांट झोन क्रमांक पाच मधील 101 किमी ची पाईपलाईन व बडनेरा परिसरातील पाईपलाईन पूर्णत्वास नेण्यात आली. डॉ.सुनिल देशमुख यांनी याकरिता वारंवार विशेष प्रयत्न केले, परंतू त्यांचा पराभव झाल्याने हा प्रकल्प पुर्णत्वास जावू शकला नाही.

निष्क्रिय लोकप्रतिनिधी ढिम्म प्रशासन यांची टोकाची अनास्था पाहता आता ही रखडलेली भुयारी गटार योजना उच्च न्यायालयाने बडगा उगारल्या शिवाय पूर्णत्वास जाणार नाही याची पूर्णत: खात्री झाल्यानेच आता न्यायालयीन लढा लढून शासनाला योजना पूर्णत्वास नेण्याकरिता बाध्य करू.



**डॉ.सुनील देशमुख,**
**माजी पालकमंत्री, अमरावती.**



# धर्माचे आचरणकर्तेच त्याचे रक्षणकर्ते आहे -सरसंघचालक डॉ. मोहन भागवत

## महानुभाव आश्रमाचा शतकपूर्ती महोत्सवच्या समारोप

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 22 ) –** सृष्टीच्या प्रारंभापासून धर्म आहे, म्हणूनच त्याला सनातन म्हणतात. जो धर्माला मानतो त्याचे कल्याण होते, जो मानत नाही त्याला ठोकर बसते. धर्म हा सत्याचा आकार असल्याने त्याचे रक्षण झाले पाहिजे. धर्माचे आचरणकर्तेच त्याचे रक्षणकर्ते आहे, असं वक्तव्य केलंय राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले. अमरावती येथील महानुभाव आश्रमाचा शतकपूर्ती महोत्सवच्या समारोप कार्यक्रमात सरसंघचालक मोहन भागवत बोलत होते.

मोहन भागवत म्हणाले की, धर्माचे आचरण समजले पाहिजे आणि समजल्यावर मनात ठेऊन चालणार नाही, तर ते बुद्धीत आणून धर्माला अपेक्षित कृती झाली पाहिजे. धर्म समजावा लागतो तो समजवणे कठीण असले तरी अडाण्याला तो लगेच समजवता येतो. पण, थोडश्या ज्ञानाने फुगलेल्याला ब्रह्मदेव पण समजावू शकत नाही. धर्माच्या नावाखाली जे अत्याचार पूर्वी झाले ते चुकीच्या समजुतीने झाले. प्रबोधन करणारे पंथ आणि संप्रदाय हे आपल्या देशाचे वैभव आहे. विपरीत परिस्थितीतही महानुभाव पंथाचे कार्य अविरत सुरू असून ते आदरणीय आहे. संप्रदाय कोणताही असो तो एकमेकांना जोडायला शिकवतो. एकता ही शाश्वत असते. सगळे विश्व एक आहे. अहिंसेने वागणे हेच धर्माचे रक्षण आहे. संघ धर्म रक्षणाचेच कार्य करतो आहे. सत्य संकल्पाने कार्य केले की ते पूर्ण होतात, असेही मोहन भागवत यांनी आवर्जून सांगितले.

### मानवतेची सेवा करणे हाच धर्माचा उद्देश

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख पुढे म्हणाले की, धर्माला नीट समजून घेतल्यास समाजात शांतता, सौहार्द आणि समृद्धी येऊ शकते. धर्माचा खरा उद्देश मानवतेची सेवा करणे आणि मार्गदर्शन करणे हा आहे आणि कोणत्याही प्रकारच्या हिंसाचाराला किंवा अत्याचारांना प्रोत्साहन देणे नाही. धर्माच्या मूलभूत तत्त्वांवर भर देताना ते म्हणाले की, धर्माचे अचूक ज्ञान आणि पालन केल्याने समाजाची उन्नती होते आणि सर्वांचे कल्याण होते. असेही मोहन भागवत म्हणाले.

### अपूर्ण ज्ञानामुळे अधर्म होतो

पुढे बोलताना मोहन भागवत म्हणाले की, धर्माचे अपूर्ण ज्ञान अधर्माकडे घेऊन जाते. धर्माच्या नावाखाली जगभर जे काही अत्याचार आणि अत्याचार झाले, ते खरे तर धर्माबद्दलच्या गैरसमजामुळे आणि अज्ञानामुळे झाले. धर्म सदैव अस्तित्वात आहे आणि जगात सर्व काही त्याच्यानुसार चालते असेही ते म्हणाले. म्हणून त्याला सनातन म्हणतात. ते पुढे म्हणाले, धर्माचे पालन करणे हेच धर्माचे रक्षण आहे.

# नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या दोन दुकानदारांवर कारवाई

### 31 हजार 300 रुपयांचा मुद्देमाल जप्त

### स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 22 ) –** जिल्ह्यात पतंगबाजीला सुरुवात झाली असून, अनेक जण प्रतिबंधीत नायलॉन मांजाने पतंगी उडवित आहे. परंतू या मांज्यामुळे अनेकांना दुखापत होत असल्याचे दिसून येत आहे. ही बाब लक्षात घेता पोलिस अधिक्षक यांच्या आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी मोर्शी व तळेगाव परिसरातील दोन दुकानांदावर कारवाई केली. संकेत रामेश्वर अंबुलकर (वय 28 वर्ष, रा. गुजरी बाजार, मोर्शी) व संतोष अयोध्याप्रसाद गुप्ता (वय 54 वर्ष, रा. चुटे चौक, तळेगाव दशासर) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्या ताब्यातून एकुन 31 हजार 300 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी शासन प्रतिबंधीत नायलॉन मांजाचा वापर होवु नये, याबाबत स्थानिक गुन्हे शाखेचे



पोलीस अधिकारी व अंमलदार यांना मार्गदर्शन करून कारवाई करण्याबाबत सुचना निर्गमीत केल्या होत्या. त्या अनुषंगाने 21 डिसेंबर रोजी स्थानीक गुन्हे शाखेचे पथकाने मोर्शी उपविभागात गोपनिय माहितीच्या आधारे संकेत रामेश्वर अंबुलकर याच्या लक्ष्मी झेरॉक्स नावाचे दुकानावर धाड टाकली. त्याच्याकडून शासनाकडुन प्रतीबंधीत नायलॉन मांजाचे 59 बंडलचा मुद्देमाल जप्त केला. स्थानीक गुन्हे शाखेचे पथकाने चांदुर रेल्वे उपविभागातील तळेगाव येथे राहणार संतोष अयोध्याप्रसाद गुप्ता याच्या श्रध्दा टॉइज नावाचे दुकाणात धाड टाकून प्रतीबंधीत नायलॉन मांजाचे 29 बंडल जप्त केले. याप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाकडुन दोन कारवाई अंतर्गत एकुन 31 हजार 300 रुपयांचा नायलॉन मांजा जप्त करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांचे नेतृत्वात पो.उप.नि. सागर हटवार, पो.उप.नि. मोहम्मद तस्लीम, पोलीस अंमलदार बळवंत दाभणे, गजेन्द्र ठाकरे, रविंद्र बावणे, भुषण पेठे, मंगेश लकडे, सचिन मसांगे, दिनेश कनोजीया, पंकज फाटे, चालक विलास रावते यांनी केली. पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांचेकडुन आवाहन करण्यात येते की, प्रतिबंधीत प्लास्टीक किंवा कृत्रीम वस्तु पासुन बनविलेल्या नायलॉन / चायनिज मांजाचा वापर टाळावा व त्याऐवजी पर्यावरण पुरक पर्यायांचा अवलंब करण्यावर भर द्यावा. घावुक व्यापारी, किरकोळ व्यापारी तसेच साठवणुकदार यांनी तत्परतेने नायलॉन मांजाची विक्री, साठवणुक थांबवावी. मानवी जिवितास किंवा पशु-पक्षी यांचे जिवितास इजा व हानी होणार नाही याची दक्षता घ्यावी. नायलॉन मांजा चा वापर होत असल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ स्थानिक पोलीसांना कळवावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# गोपगव्हान परिसरात तरुणाची हत्या

### शेतशिवारात आढळला मृतदेह

### अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 22 ) –** खोलापुरी गेट हद्दीतील गोपगव्हाण शेतशिवारात धारदार शस्त्रांनी एका युवा शेतकर्याची हत्या करण्यात आल्याची घटना 21 डिसेंबर रोजी मध्यरात्रीदरम्यान घडली. सुनील सुखदेव सोळंके (42, गोपगवान पुनर्वसन) असे मृतकाचे नाव आहे. या घटनेमुळे गावात खळबळ उडाली असून, पोलिसांनी आरोपीचे शोध कार्य सुरु केले आहे. परंतू 22 डिसेंबरच्या सायंकाळपर्यंत आरोपींना अटक झालेली नव्हती. सुनील सोळंके यांचे गोपगव्हान शिवारात शेत असल्यामुळे ते रोज रात्री शेतात जात होते. शनिवारी रात्री ते आपल्या शेतात गेले होते. त्यानंतर ते परतले नाही. दरम्यान 22 डिसेंबर रोजी सकाळी सुनील सोळंके यांचा मृतदेह गोपगव्हाण येथील शेतात आढळून आला. त्यामुळे काही नागरिकांनी या घटनेची माहिती खोलापुरी गेट पोलिसांना दिली.

# न्यू साई कॉलनीतून दुचाकी लंपास

**अमरावती**–गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीतील तपोवन परिसरातील न्यू साई कॉलनीतून दुचाकी लंपास करण्यात आली. ही घटना 21 डिसेंबर रोजी उघडकीस आली. न्यू साई कॉलनी येथील रहिवासी गणेश गुरुदेव झारखंडे (38) यांनी आपली दुचाकी क्रमांक एमएच 27 सीई 2960 ही घरासमोर उभी केली होती. सदर दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. ही बाब लक्षात आल्यावर गणेश झारखंडे यांनी गाडगेनगर ठाण्यात तक्रार दाखल केली. पुढिल तपास गाडगे नगर पोलीस करीत आहे.




# रहेमतनगर येथे तरुणाला मारहाण

**अमरावती** – नागपुरी गेट ठाण्याच्या हद्दीतील रहेमतनगर येथे एका तरुणाला काठीने मारहाण करण्यात आली. ही घटना 21 डिसेंबर रोजी घडली. रहेमतनगर येथील रहिवासी रहीम खान हफीज खान (25) व त्यांच्या पत्नीत वाद सुरू होता. त्यावेळी शेजारी राहणारे नाशीर खान व सादीक खान हे दोघे त्यांच्या घरासमोर आले. त्यांनी शिवीगाळ सुरू केली. त्यामुळे रहीम खान हे घराबाहेर आले. त्यावर नाशीर खान व सादीक खानने त्यांना शिवीगाळ करून काठीने मारहाण केली. या प्रकरणी रहीम खान यांनी नागपुरी गेट ठाण्यात तक्रार दाखल केली.

# सायबर फ्रॉडचे वर्षभरात 48 गुन्हे, 7 कोटीची फसवणूक

## 4 लाख 40 हजार रुपयांची रोख जप्त ■ 65.20 लाखांची रोख परत आणण्यात पोलिसांना यश

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 22 ) –** सायबर गुन्हेगारातून नागरिकांची फसवणूक होत असल्याचे प्रकार दिवसेदिवस वाढत आहे. अशातच गेल्या अकरा महिन्यात अमरावती शहर सायबर पोलिस ठाण्यात फसवणुकीबाबतचे 48 गुन्हे नोंदविण्यात आले असून, यामधून नागरिकांची तब्बल 7 कोटी 84 लाख 42 हजार रुपयांनी फसवणूक करण्यात आली आहे. यामध्ये पोलिसांनी काही आरोपींना अटक करून,



त्याच्याजवळील 4 लाख 40 हजाराची रोख जप्त केली असून, फसवणुकीतील तब्बल 65 लाख 20 हजार रुपयांची रक्कम परत आणण्यात यश मिळविले आहे.

### डिजीटल अरेस्टचा नवीन फंडा

सायबर गुन्हेगार आता डीजीटल अरेस्ट सारखे प्रकार करून नागरिकांना लाखोंचा गंडा घालत आहे. अमरावती शहरात याप्रकारचे गुन्हे उघडकीस आले असून, नागरिकांना ब्लॅकमेल करून पैसे उकळण्याचे प्रकार घडत आहे. पोलिस अधिकारी असल्याचे भासवून गुन्हा दाखल झाल्याची भिती दाखविणे आणि तुम्हाला अटक करावी लागेल, अशी धमकी देऊन नागरिकांची फसवणूक केली जात आहे.

सायबर गुन्हेगार नवीन नवीन फंडे वापरून नागरिकांची फसवणूक करीत आहेत. या तक्रारीवरून सायबर यंत्रणा तपास कार्य करून आरोपींचे शोध घेत आहेत. पोलिस उपायुक्त कल्पना बारवकर यांनी सायबर गुन्ह्यांवर अंकुश लावण्यासाठी प्रयत्न चालविले आहेत. नागरिकांना सतर्क राहून आपले आर्थिक व्यवहार करण्याचे आवाहन केले आहे.

# पालकाचे रिल्स मुलांनाही होते फील

### मोबाईल चा विळखा वेड लावणारा

**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी, ( दि.22 )–** प्रत्येकाच्या हातात मोबाईल व काही सेकंदाच्या रिल्सची तरुण ज्येष्ठ नागरिक नव्हे तर महिलांनाही भुरळ पडली आहे. याचा मोठा दुरगामी परिणाम शाळकरी मुलांवर होत आहे. लाइक व कमेंट मिळवण्यासाठी धडपड प्रत्येक व्यक्ती समाज माध्यामांवर ऑनलाइन असतो. रिल्स पाहणे व त्या काढून पोस्टही करतो, बहुतांश शाळकरी व महाविद्यालयीन तरुण त्या बनवण्यासाठी बाइक स्टंट सिगारेट दारु अशा लक्ष वेधून घेणाऱ्या कृती करत सोशल मीडियावर लाइक आणि कमेंट मिळवण्यासाठी



धडपडत आहेत, कारण पालकच रिल्समध्ये गुरफटले असल्याने शाळकरी मुलांना जाब कोणी विचारायचा बंधने कोणी घालायची यात शिक्षकही मागे नसल्याने परिस्थिती हाताबाहेर जाऊ लागली आहे.

एकविसावे शतक समाज माध्यमांनी पूर्णपणे आपल्या कवेत घेतले आहे. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे केवळ शाळकरी महाविद्यालयीन तरुणच नव्हे तर पालक असलेले ज्येष्ठ नागरिकही रिल्सच्या विळख्यात गुरफटले आहेत. पालकांनाच रिल्सचे वेड लागले, असल्याने मुलांमध्येही याचे आकर्षण निर्माण होत आहे. यातून विद्यार्थ्यांचे शिक्षण, अभ्यास अध्यापनावर विपरित परिणाम होत आहे. साधने वाढली संवाद हरवला. अलीकडच्या काळात सोशल मीडियाचा वापर कमालीचा वाढला आहे. यामुळे संवाद कमी झाला आहे. साधने वाढली संवाद उरला नाही अशी परिस्थिती आहे. सार्वजनिक ठिकाणे चौक ग्रामीण भागातील चार चौघांतील सर्वच मोबाईलमध्ये डोके घालुन बसलेले असतात.

### तर मोबाईल मुक्ती केंद्रे उघडावी लागतील

व्यसनाधीनता वाढत असली तरी शाळकरी मुलेही व्यसनाच्या आहारी जात आहेत. अभ्यास शाळा महाविद्यालय व जीवन जगण्याची कला शिकवणारे छोटे-मोठे काम सोडून रिल्समध्ये सारेच गुरफटत आहेत, हीच परिस्थिती आणखी काही वर्षे कायम राहिली तर भविष्यात जागोजागी व्यसनमुक्ती प्रमाणेच मोबाईल मुक्ती केंद्रे उघडावी लागतील. यामुळे किमान पालकांनी भान ठेवून मुलांवर लक्ष ठेवण्याची गरज आहे.

सोशल मीडियावर रील्स बनवण्याचे फॅड सर्व वर्गातील लोकांमध्ये आहे. अनावश्यक प्रसिद्धी व लाइक मिळवण्यासाठी रिल्स तयार केले जातात आणि सध्याच्या काळात मुलांना जेवतांनासुद्धा आई-वडिलांकडून मोबाईल दिले जाते. मोबाईल मुळे समाज जरी सोशल मीडियावर जुडलेले असले. तरी वास्तविकतेत एकमेकांपासुन दुर झाले आहे.

**नरेंद्र टाले, एक पालक.**

# वरुड-मोर्शी विधानसभेमध्ये प्रहारला खिंडार

## डॉ.महेंद्र राऊत यांचा भाजपात प्रवेश

### आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची तयारी

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड, ( दि.22 )–** नुकत्याच पुसला येथील रोग निदान शिबिरामध्ये प्रहारचे वरुड मोर्शी विधानसभेचे विधानसभा प्रमुख डॉ.महेंद्र राऊत यांनी राज्यसभेचे खा.डॉ.अनिल बोंडे व माजी खासदार रामदास तडस यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश केला. त्यामुळे वरुड मोर्शी विधानसभेमध्ये प्रहारला खिंडार पडणार असल्याचे दिसत आहे.

नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत मतदारसंघातच नव्हे तर संपूर्ण राज्यात भाजपाला घवघवीत यश मिळाले, त्यामूळे पक्षात येणाऱ्या लोकांची संख्या सुरू झाली आहे.

कदाचित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची तयारी तर नाही ना असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित केला जात आहे, मात्र डॉ. महेंद्र राऊत यांच्या पक्षप्रवेशामुळे पुन्हा भाजपला बळ मिळाले असल्याची चर्चा तालुक्यात जोर धरू लागली आहे.



### प्रहारकडून लढणार होते विधानसभा

पेशाने डॉक्टर असलेले अस्थिरोग तज्ञ महेंद्र राऊत मागील तीन वर्षापासून समाजसेवेचे व्रत घेऊन राजकारणात सक्रीय आहेत. नुकत्याच झालेल्या विधानसभेची त्यांची प्रहारच्या माध्यमातून तयारी होती, परंतू प्रहारकडून त्यांना उमेदवारी मिळाली नाही. यामूळेच कदाचित त्यांनी भाजपमध्ये प्रवेश करुन प्रहारची कास सोडली असावी, अशी चर्चा चर्वण तालुक्यात सुरु आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# बोराळा रस्त्यावरील मुरूमाच्या ट्रकांची जीवघेणी वाहतूक?

## महसूल विभाग आंधळ्याच्या भूमिकेत






**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा,( दि.22 )-** खदानी वरून ओवरलोड मुरुम भरुन नजिकच्या परसापूर ते बोराळा मार्गावर बेदारकपणे धावणारे ट्रक वाटसरुंच्या जीवावर उठत आहेत. मात्र पोलीस व महसूल प्रशासन आंधळ्याच्या भूमिकेत दिसत आहेत. खदान चालकांनी या परिसरात अक्षरशः हैदोस घातला आहे. खदानीवर ब्लास्टिंगचा उपयोग करून मुरूम काढण्यात येत आहे. मोठमोठ्या टेकड्या ब्लास्टिंगचा उपयोग करुन सपाट केल्या जात आहे. यामुळे पर्यावरणाला मोठ्या प्रमाणात धोका निर्माण झाला आहे.

महसूल प्रशासनाने खदानीवरून मुरूमाची वाहतूक करण्यासाठी नियमावली खदान चालकांना दिली होती, परंतु नियमावलीचे उघडपणे उल्लंघन केले जात आहे. येथे पहाटे रात्री चार वाजता पासून मुरुमाची चोरटी वाहतुक सुरु होती. परसापूर ते बोराळा वरून गौरखेडा बाजार कडे जाणारा हा मार्ग नवनिर्वाचित मेळघाटचे आमदार केवलराम काळे यांच्या गावाला जोडणारा आहे. या ओव्हरलोड टीप्पर, ट्रकमुळे या मुख्य मार्गाची अत्यंत दुरवस्था झाली आहे. खड्डयात रस्ता आहे, की रस्त्यात खड्डा हेच कळत नाही. थातूरमातूर पद्धतीने खड्डे बुजविण्याचे काम काही दिवसापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाने येथे केले होते, परंतु मुरुमाच्या ओव्हरलोड ट्रकांच्या वाहतुकीमुळे पुन्हा या रस्त्याची दूरवस्था झाली आहे. खदान चालकांच्या डोक्यावर हात कुणाचा? असा प्रश्न या प्रकारामूळे निर्माण होत आहे. मुरूमाच्या ओव्हरलोड ट्रकांची वाहतुकीने या रस्त्याची चाळण केली आहे. आमदार केवलराम काळे या प्रकार काय अंकुश लावणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले.

### कोऱ्या पासेस वर ओवरलोड मुरूमाची वाहतूक



बोराळा येथील खदानीवरून मुरूमाची वाहतूक करण्यासाठी महसूल विभागाने खदान चालकांना नियमाप्रमाणे पासेचे बुक दिले होते, परंतु कार्बन कॉपी वर पासेस रिकामी ठेवत चक्क रिकाम्या पासेस वरच बोराळा येथील खदानी वरून मुरुमाची वाहतूक अवैध पद्धतीने होत आहे. मुरूमाच्या वाहतुकीवर जिल्हा खनिकर्म अधिकारी, चिखलदरा तहसीलदार व महसूल प्रशासनाचे इतर अधिकारी मुखदर्शी दिसत आहे.

### 'भरारी' पथक च 'फरारी'त

रेती, मुरुमाची चोरटी वाहतुक रोखण्याकरिता चिखलदरा तहसील प्रशासनाने भरारी पथकांची निर्मीती केली होती. 4 डिसेंबर पासून मंडळ अधिकारी व पटवारी यांचे हे भरारी पथक परसापूर मार्गावर वेगवेगळ्या दिवशी तपासणी करणार होते. परंतु या मार्गावरी भरारी पथकच फरारीत असल्याचे पहायला मिळत आहे. त्यामूळे अवैध पद्धतीने उत्खनन करून ओवरलोड मुरूमांच्या ट्रकांची वाहतूक राजरोसपणे होत आहे.

### आरटीओ विभाग पांढरा हत्ती

बोराळा येथील खदानीवर टिप्पर, ट्रक अवैध पध्दतीने मुरुमाची वाहतूक करित आहे. या ओव्हरलोड वाहनावर कारवाई करण्याची जबाबदारी प्रादेशिक परिवहन अधिकारी म्हणजेच आरटीओची आहे. या वाहनांचे परमिट, फिटनेस, इन्शुरन्स कालावधी समाप्त झाल्यावरही अवैध स्वरूपात टिप्पर व ट्रक मालक खदानी वरून ओवरलोड धावत आहेत. कारवाई करण्याकरिता पात्र असलेल्या या वाहनांचा अभय देण्यामागील आरटीओची भूमिका स्पष्ट दिसत असल्याचे नागरिक सांगत आहे. आरटीओ चे अधिकारी व खदान मालक हातमिळवणी करुन हे गौडबंगाल चालवित आहे.

# 'गुटखा' विक्रीवर प्रशासनाचा डोळा 'फुटका'?

## टपरी ते किराणा दुकान सर्रास उपलब्ध




**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, ( दि.22 )-**महाराष्ट्रात गुटखा विक्री बंदीचा कायदा हा 20 जुलै 2012 रोजी अमलात आला. परंतू हा कायदा बारा वर्ष होऊन फक्त नावापुरताच शिल्लक राहिला असल्याचे दिसुन येत आहे. अंजनगाव सुर्जी तालूक्यातील प्रत्येक पान टपरी आणि किराणा दुकानातही सर्रासपणे गुटख्याची विक्री सुरु आहे. गुटखा बंदी ही अवैध व्यावसायिक व प्रशासनाच्या झारीतील शुक्राचार्यांकरिता कमाईचे साधन बनले आहे. त्यामूळेच पोलीस प्रशासन, अन्न व औषध प्रशासन याकडे फुटका डोळा करुन पाहतात.

गुटखा किंवा पान मसाला यामुळे कर्करोग होतो, हे लहान मुलालाही माहीत आहे. राज्यात दरवर्षी लाखो तरुणांचा मृत्यू हा गुटखा खाल्ल्यामुळे होतो. ही बाब हे तत्कालीन महाराष्ट्र शासनाने गुटखा विक्री, वाहतूकीवर संपुर्ण राज्यात बंदी घातली होती. 2012 ला हा कायदा अमलात आल्यानंतर काही दिवस गुटखा हा पानठेला किंवा इतरत्र दिसत नव्हता. विशेष म्हणजे तेव्हा देवेंद्र फडणवीस सरकारनेच हा कायदा पास केला होता. परंतू यानंतर पुलावरुन बरेच पाणी वाहून गेले. अंजनगाव शहर व ग्रामीणमधील पानटपरी, दुकानांमध्ये गुटख्याची विक्री होत आहे. गुटखा विक्री होत असतानाही कारवाई होतांना दिसत नाही. अमरावती शहरापासून ते अंजनगाव शहर हे 80 किलोमीटर अंतरावर आहे, तर आंतरराज्यीय मध्यप्रदेश सिमांवर पोलिसांचे तपासणी नाके असतानाही अंजनगाव शहरात गुटखा येतोच कसा, या प्रश्नांचे ठाम उत्तर अधिकारी देऊ शकत नाहीत. अंजनगाव शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात गुटखा विक्रीला येतो. गुटखा बंदी नंतर अनेकांनी नागपूरी खर्रा (मावा) विक्रीचा नवा व्यवसाय सुरू केला.

त्यातूनच गुटख्याची विक्री सुरवातीला चोरून केली जात होती. आता सर्रासपणे केली जात आहे. तरुणांना व्यसनाधीन पासून दूर ठेऊन निरोगी, सदृढ समाजाच्या निर्मितीसाठी गुटखा, मावा विक्रीवर कडक निर्बंध लावण्यात आले.

पण शासकीय यंत्रणांच्या दुर्लक्षामुळे कायद्याचे पालन होत नाही. शहरातच नव्हे तर ग्रामीण भागात गुटखा विक्री सर्रासपणे पानटपरी दुकानांमध्ये होते. गुटखा विक्रीसाठी व्यापाऱ्यांची मोठी साखळी कार्यरत आहे. ही साखळी अमरावती ते अंजनगाव सुर्जी शहरापर्यंत असुन ही साखळी तोडणे गरजेचे आहे. तेव्हाच गुटखा विक्री कमी होण्यास मदत होईल.

# संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी आज कार्यशाळा

**वरुड -** शहरातील माधवराव काठीवाले सभागृहात सोमवार (दि.23) ला सकाळी 11 वाजता डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला यांच्या वतीने संत्रा मोसंबी लिंबू उत्पादक शेतकऱ्यांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष कुलगुरू डॉ. शरद गडाख उपस्थित राहणार असून कार्यशाळेचे उद्घाटन राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे करणार आहे. सत्कारमूर्ती म्हणून वरुड मोर्शी मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर तर कृषी विद्यापीठाचे सदस्य मोरेश्वर वानखडे यांचे प्रमुख उपस्थिती राहणार आहे. अनेक मान्यवरांचे आंबिया व मृग तथा फळगळ इत्यादी विषयावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन होणार आहे. तालुक्यातील प्रगतिशील शेतकऱ्यांचा सत्कार आयोजित करण्यात आला आहे शेतकऱ्यांनी या कार्यशाळाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा अशी विनंती अचलपूर कृषी संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. योगेश चर्जन, अमरावती येथील प्रमुख प्रादेशिक संशोधन केंद्राचे डॉ. सतीश निचळ यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# स्मशानभूमीची स्वच्छता करुन गाडगेबाबांना श्रध्दांजली



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.22 )-** संपूर्ण आयुष्य समाजसेवेकरता समर्पित करणारे संत श्री गाडगे महाराज ज्यांनी कीर्तनाच्या माध्यमातून समाजातील अंधश्रद्धा शिक्षणाचे महत्त्व व्यसनमुक्तीचा संदेश जनसामान्य माणसाला दिला. कुष्ठरोगी दिव्यांगांची सेवा केली. खराट्याच्या माध्यमातून गावाचे गावाची स्वच्छता करून रात्रीला कीर्तनाच्या माध्यमातून लोकांच्या मनातील अंधश्रद्धा दूर केली. अशा महामानवाची पुण्यतिथी वणी बेलखेडा येथील ग्रामस्थांनी स्मशानभूमी ची पूर्ण स्वच्छता करून साजरी केली स्मशानभूमीचा संपूर्ण परिसर स्वच्छ करून त्या ठिकाणी संत गाडगे महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. गाडगे महाराजांच्या कार्याचे महत्त्व मंगेश देशमुख यांनी सांगितले. त्यानंतर सर्वांना त्या ठिकाणी अल्पोहार देण्यात आला. यावेळेस या कार्यक्रमाला अशोकराव अलोने, अतुल ठाकरे, सुरेशराव खैरकर, भीमराव हरणे, प्रफुल नवघरे, बाळूभाऊ कोठाळे, महादेवराव शेळके, अमोल शेळके, अमोल ठाकरे, सुनील मोहोळ, अतुल राऊत, उमेश आवारे, सुमित शेळके, शिवदासराव शेळके, पुरुषोत्तमराव चेळे, वसंत नवघरे मोठ्या प्रमाणात गावकरी मंडळी उपस्थित होते.

# कमी वयात पळून लग्न करणे हे कुपोषणनाचे मुळ कारण-ठाणेदार




**महासागर प्रतिनिधी**

**धारणी, ( दि.22 )-** कमी वयात पळून जाऊन लग्न करणे त्यातून अनेक समस्या जन्माला येतात, कुपोषण या समस्येचे हे ही एक कारण असल्याचे प्रतिपादन धारणी पोलीस स्टेशनचे ठाणेदार अशोक जाधव यांनी केले. ते तालुक्यातील दहेंडा येथील जीवन विकास विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने टिंगऱ्या येथे आयोजित सात दिवसीय राष्ट्रीय सेवा योजना श्रम संस्कार शिबिराचे उद्घाटक म्हणून बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून तहसीलदार प्रदीप शेवाळे व विशेष अतिथी म्हणून पत्रकार ज्ञानदेव येवले उपस्थित होते.

ठाणेदार जाधव पुढे म्हणाले की, कारण जे वय शिकण्याचे असते, भवितव्य घडविण्याचे असते, त्या वयात मुले क्षणिक सुखासाठी आयुष्य बर्बाद करतात. त्यांना योग्य वयात योग्य मार्गदर्शन मिळल्यास ते आपले बरेवाईट समजू शकतील आणि असे शिबीर अशा मार्गदर्शनाकरिता शंभर टक्के उपयुक्त असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच राहुल पटेल, सेवा निवृत्त तलाठी राजाराम आरोटकर, दुर्गेश आरोटकर, सुरेंद्र तांडील, उदयसिंग चव्हाण, महाविद्यालयाचे प्राचार्य अर्मळ उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य अर्मळ यांनी तर सूत्रसंचालन शिक्षक निंभोरकर यांनी व आभार प्रदर्शन सहा.शिक्षक पटेल यांनी केले. कार्यक्रम आयोजन व यशस्वी करण्याकरिता शिक्षक, रा. से.यो.दयाराम सेलुकर, कार्यक्रम अधिकारी विरखडे, विलास भोंगाडे, राजू भिलावेकर, मनीषा चतुरकर, शिक्षक पराग गिरी, अभिषेक धीकार, सचिन भिलवेकर यांनी अथक परिश्रम घेतले.

### राष्ट्रीय सेवा योजना शिबीराचे उद्घाटन

#### सर्वांचा विचार करण्याची भावना मिळते!

तहसीलदार प्रदीप शेवाळे यांनी मार्गदर्शन करताना आपले महाविद्यालयीन जीवनातील अनुभव राष्ट्रिय सेवा योजना चे महत्वाबद्दल महिती व त्यातून त्यांचा झालेला विकासा याबाबत माहिती दिली. मी नाही परंतु सर्व विश्व ही भावना म्हणजेच सर्वांचा विचार करण्याची भावना राष्ट्रिय सेवा योजनेतून मिळते.

# पुन्हा मायक्रो फायनान्सच्या जाळ्यात अडकल्या महिला

## ग्रामीण मजूरांना सावज बनवित आहेत दलाल



**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट,( दि.22 ) -** ग्रामीण भागातील महिला मजुरांना वित्तीय पुरवठा करणाऱ्या छोट्या वित्तीय संस्था मागील दहा ते बारा वर्षांपासून कार्यरत आहेत. ज्या ग्रामीण भागातील गरीब महिलांना आपले सावज बनवित आहेत. ग्रामीण भागातील महिला मजूर पुन्हा एकदा या मायक्रो फायनान्सच्या जाळ्यात अडकल्या पहायला मिळत आहे.

दर आठवड्याला लाखो रुपयांची उलाढाल होत असून, अनेक महिला कर्जबाजारी होत आहेत. या मायक्रो फायनान्स कंपन्यांचे प्रतिनिधी (दलाल) गावागावात जाऊन आठ दहा महिलांचा गट बनवून सुरुवातीला प्रतिमहिला 30 हजार रुपयांचे कर्ज देतात. नंतर गटाचा सिबिल कोअर चांगला असल्यास कर्जाची रक्कम वाढविली जाते. या कर्जाची परतफेड दर आठवड्याला करावी लागते. आठवड्याच्या ठरावीक दिवशी मायक्रो फायनान्स कंपनीचे प्रतिनिधी एका विशिष्ट ठिकाणी बसून कर्जाची वसुली करतात. ग्रामीण भागातील मजूर महिलांना नियमित मजुरी मिळत नाही. यामुळे संसार चालवताना आर्थिक अडचणी येतात. मायक्रो फायनान्स कंपनी कर्जाची एकदम रक्कम देत असून, थोड्या थोड्या रकमेने वसूल करते. परंतु, फायनान्सचा हप्ता चुकविता येत नसल्याने हप्ता भरण्याकरिता काही महिलांची चांगलीच तारांबळ उडते. बरेचदा या महिलांना खासगी सावकाराचे कर्ज काढून हप्ता भरावा लागतो. त्यामुळे एका कर्जावर दोनदा व्याज भरणा करण्याची वेळ या महिलांवर येत आहे.

### हप्ता चुकला की, दंड

हप्ता चुकला की दंड मायक्रो फायनान्सकडून घेतलेल्या कर्जाचा हप्ता चुकविता येणार नाही, असा दंडक आहे. ग्रुपमधील एखाद्या महिलेने कर्जाचा हप्ता चुकवला तर ग्रुपमधील इतर सर्व महिलांनी मिळून त्या महिलेचा कर्जाचा हप्ता भरावा लागतो. अशावेळी ज्या महिलेने हप्ता भरला नाही. त्या महिलेस दंड भरावा लागतो.



# निकेश पिंपळकर शिवसेनेचे (उबाठा) अचलपूर उपतालुका प्रमूख

**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा,( दि.22 )-** अचलपूर येथील युवा तडफदार कार्यकर्ते निकेश पिंपळकर यांची अचलपूर तालुका उपप्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली. 21 डिसेंबर रोजी परतवाडा येथील विश्रामगृहात शिवसेना उबाठा पक्षाचे उपनेते तथा संपर्क प्रमुख सुधिर सुर्यवंशी यांच्या उपस्थितीत आढावा बैठक पार पडली. यावेळी या पदाची जबाबदारी पिंपळकर यांच्याकडे देण्यात आली. प्रसंगी तालुक्यातील बहुतांश शिवसेना उबाठा पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते. या निवडीकरिता अनेक शिवसैनिकांनी पिंपळकर यांचे अभिनंदन केले आहे.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीस द्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार विजय महादेव धुळे, रा. अंजनगांव सुर्जी ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथील कायमचा रहीवाशी आहे. त्यांच्या जन्माची नोंद नगरपरिषद/ ग्रामपंचायत कार्यालय अंजनगांव सुर्जी येथे रजिस्टरमध्ये जन्माची नोंद नसल्याने त्यांनी जन्म/मृत्यू अधिनियम १९६६ चे कलम १३ (३) अन्वये मृत्यूच्या नोंदीचे आदेश होण्याकरीता दिनांक ३०/१०/२०२४ रोजी विनंती अर्ज या कार्यालयात सादर केला आहे.

त्यामुळे अर्जदारांनी दिलेल्या अर्जावरून जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात येत आहे. विजय महादेव धुळे हे कायमचे रहीवाशी आहे. त्यांचा जन्म दि. १७/०७/१९५८ रोजी त्यांच्या राहत्या घरी मौजा अंजनगांव सुर्जी ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथे झाला आहे. त्याबाबत कोणाची हरकत किंवा आक्षेप अथवा तक्रार असल्यास किंवा प्रकरणात काही म्हणावयाचे असल्यास त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत स्वत: अथवा आपल्या अधिवक्ता मार्फत लेखी म्हणने सादर करावेत अन्यथा ३० दिवसांनंतर जर कोणाची हरकत किंवा आक्षेप अथवा तक्रार प्राप्त झाल्यास त्याचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

कोर्ट शिक्का

**( रविंद्र काळे )**
**निवासी नायब तहसीलदार**
**अंजनगांव सुर्जी**

## जाहीर नोटीस

**अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथील ( कु.स्नेहा रा. जाधव ) दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.६४३/२०२४ ने.ता. २३/०१/२०२५

मोहम्मद जाकीर अब्दुल सत्तार वय ३६ वर्षे धंदा- मजुरी
रा. नागाजी प्लॉट, अंजनगाव सुर्जी ता. अंजनगाव सुर्जी जि. अमरावती .... अर्जदार
विरूद्ध
निरंक .... गैरअर्जदार

ज्याअर्थी या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे वडील नामे अब्दुल सत्तार मोहम्मद शब्बीर यांचा दिनांक २९/०६/२०२३ रोजी मृत्यू झाला आहे. अर्जात नमूद केल्याप्रमाणे यांचे वारस खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसाचे नाव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १. | जयबुन्निसा बी अब्दुल सत्तार | वय ६५ वर्षे | पत्नी |
| २. | अब्दुल सलीम अब्दुल सत्तार | वय ४६ वर्षे | मुलगा |
| ३. | अब्दुल वसीम अब्दुल सत्तार | वय ४३ वर्षे | मुलगा |
| ४. | अब्दुल नईम अब्दुल सत्तार | वय ४१ वर्षे | मुलगा |
| ५. | नुरजहां बानो अब्दुल रहेमान | वय ४१ वर्षे | मुलगी |
| ६. | नाजरिन परवीन अब्दुल निसार | वय ३८ वर्षे | मुलगी |
| ७. | मोहम्मद जाकीर अब्दुल सत्तार | वय ३६ वर्षे | मुलगा |
| ८. | शेख अय्याज अब्दुल सत्तार | वय ३६ वर्षे | मुलगा |
| ९. | नसरीन बानो अब्दुल सत्तार | वय ३३ वर्षे | मुलगी |

या व्यतिरिक्त ईतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

अब्दुल सत्तार मोहम्मद शब्बीर हे मरण पावल्यामुळे त्यांच्या मृत्युनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामाकरीता तसेच इतर कामाकरीता वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अंजनगांव सुर्जी येथे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (१८२७) चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज केला असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध तारखेपासून एक महिण्याचे आत आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा या अर्जावर कुणाचाही आक्षेप, हरकत नाही असे गृहित धरून अर्जावर सुनावणी करून अर्जदारांना वारसाचे प्रमपाणपत्र दिल्या जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १९/१२/२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

कोर्ट शिक्का

**आदेशासार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, अंजनगांव सुर्जी जि. अमरावती**

## जाहीर नोटीस

**अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथील ( श्री. एस.एम. जाधव ) दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.६४४/२०२४ ने.ता. २९/०१/२०२५

शबाना अंजुम शेख नजीर वय ४९ वर्षे धंदा- घरकाम
रा. वलगांव रोड, विदर्भ महाविद्यालय, अमरावती, ता. जि. अमरावती .... अर्जदार
विरूद्ध
निरंक .... गैरअर्जदार

ज्याअर्थी या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे वडील नामे शेख उस्मान शेख अहेमद यांचा दिनांक ३१/०३/२०२४ रोजी मृत्यू झाला आहे. अर्जात नमूद केल्याप्रमाणे यांचे वारस खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसाचे नाव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १. | कैसर बी उस्मान शेख | वय ६८ वर्षे | पत्नी |
| २. | शबाना अंजुम शेख नजीर | वय ५७ वर्षे | मुलगी |
| ३. | अब्दुल सलीम शेख उस्मान | वय ४५ वर्षे | मुलगा |
| ४. | शाहीस्ता परवीन अब्दुल बाकीर | वय ४० वर्षे | मुलगी |

या व्यतिरिक्त ईतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

शेख उस्मान शेख अहेमद हे मरण पावल्यामुळे त्यांच्या मृत्युनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामाकरीता तसेच इतर कामाकरीता वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अंजनगांव सुर्जी येथे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (१८२७) चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज केला असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध तारखेपासून एक महिण्याचे आत आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा या अर्जावर कुणाचाही आक्षेप, हरकत नाही असे गृहित धरून अर्जावर सुनावणी करून अर्जदारांना वारसाचे प्रमपाणपत्र दिल्या जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १६/१२/२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

कोर्ट शिक्का

**आदेशासार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर,**
**अंजनगांव सुर्जी जि. अमरावती**

## जाहीर नोटीस

**अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथील ( श्री. एस.एम. जाधव ) दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.६४२/२०२४ ने.ता. २९/०१/२०२५

चंद्रशेखर नागोराव धनोकार वय ५९ वर्षे धंदा- शेती
रा. विहीगांव ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती .... अर्जदार
विरूद्ध
निरंक .... गैरअर्जदार

ज्याअर्थी या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे वडील नामे नागोराव चंद्रभान धनोकार यांचा दिनांक २९/०६/२०१० रोजी मृत्यू झाला आहे. तसेच अर्जदाराची आई नामे शकुंतलाबाई नागोराव धनोकार यांचा दिनांक २२/११/२०१६ रोजी मृत्यू झाला आहे. अर्जात नमूद केल्याप्रमाणे यांचे वारस खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसाचे नाव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १. | चंद्रशेखर नागोराव धनोकार | वय ५९ वर्षे | मुलगा |

या व्यतिरिक्त ईतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

नागोराव चंद्रभान धनोकार, शकुंतलाबाई नागोराव धनोकार हे मरण पावल्यामुळे त्यांच्या मृत्युनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामाकरीता तसेच इतर कामाकरीता वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अंजनगांव सुर्जी येथे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (१८२७) चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज केला असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध तारखेपासून एक महिण्याचे आत आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा या अर्जावर कुणाचाही आक्षेप, हरकत नाही असे गृहित धरून अर्जावर सुनावणी करून अर्जदारांना वारसाचे प्रमपाणपत्र दिल्या जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १६/१२/२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

कोर्ट शिक्का

**आदेशासार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, अंजनगांव सुर्जी**
**जि. अमरावती**